
ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 9 | October - 2016

Indian Streams Research Journal

# महात्मा गांधीजींची ग्राम विकास संकल्पना

प्रा. विजय कौतीकराव देसले
श्रीमती वि.उ. पाटील कला व कै. डॉ. बि.एस. देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री, जि. धुळे.



**प्रस्तावनाः-**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहासाचा अभ्यास करीत असतांना भारतातील अभ्यासक महात्मा गांधींना सबंध भारताचे मार्गदर्शक म्हणून संबोधतात असे दिसते मात्र महात्मा गांधीजींच्या संपुर्ण कार्याचा अभ्यास केला असता गांधीजींचे राष्ट्रीय चळवळीच्या कार्यापेक्षा जास्त कार्य हे ग्रामीण विकास व स्वयं:पुर्ण भारत या विषयी केलेले दिसते. गांधीवर आफ्रिकेत असतांनाच अमेरिकेतील विचारवंत हेन्री डेव्हिज थोरो याचा प्रभाव पडलेला दिसतो. या थोरोच्या विचारांवर आजही "साधेपणाचा दिवस" साजरा केला जातो. साधेपणाची शिकवण थोरोने जगाला दिली हा थोरो अमेरीकेत अत्यंत लहान झोपडीत आपले जीवन व्यतित करीत असे. या थोरोच्या 'सिव्हील डिसओबीडिअन्स' या निबंधापासून प्रेरणा घेवुन गांधीजींनी ब्रिटीश सरकारच्या विरोधात सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु केली होती. "१थोरोने अमेरिकेत सरकारला कर देवु नये याकरीता आंदोलन उभारले होते. सरकारला कर फक्त दिवा बत्ती, रस्ते, आणि पाणी या करीताच द्यावा असे थोरोचे मत होते. थोरोच्या या धोरणामुळे त्याला कारावास भोगावा लागला. तरी त्याने सरकारला कर दिला नाही. थोरो म्हणतो सरकारला कर दिला पाहिजे मात्र सरकारने त्याचा उपयोग इतरांवर राज्यकरण्यासाठी करु नये असे त्याचे मत होते. या थोरोच्या विचारांचा प्रभाव गांधींवर पडला. याच भावनेतुन गांधींनी परंपरागत भारतीय समाज व्यवस्थेची नैतिक तत्वांच्या आधारे अमुलाग्र पुर्नबांधणी करण्याचा निश्चय केला. व सबंध भारतीय जनाचा विकास करण्यासाठी ग्राम विकासाची कास धरली. आर्थिक साम्राज्य वादाला प्रभावी उत्तर द्यावयाचे असेल तर गावा गावातील विकास त्यांना आवश्यक वाटला त्यासाठी पुर्वापार चालत आलेली ग्राम व्यवस्था म्हणजे स्वयं:पुर्ण खेडी व त्यातील जनता सक्षम करणे ही काळाची गरज ओळखली व राष्ट्रीय आंदोलनाची मुहर्तमेड करावयाची असेल तर समाज उभा करावा लागेल समाज हा गावातून उभा होईल आणि तो समाज आत्मनिर्भर असला तर ताठर उभा राहील याची पुर्ण जाणीव गांधींजींना होती. म्हणून त्यांनी अभ्यासलेल्या "अंटु धिस लास्ट" या रस्किन लिखित पुस्तकाचा प्रभाव गांधींवर दिसतो. त्या पुस्तकातूनच सर्वोदयाची भुमिका गांधीमध्ये निर्माण झाली. "परंपरागत भारतीय समाजव्यवस्थेची नैतिक तत्वांच्या आधारे आमुलाग्र पुर्नबांधणी करण्याची एक विचार प्रणाली, सर्वांचे कल्याण, सर्वांचा उदय असा सर्वोदय शब्दाचा भावार्थ आहे. याचाच विचार आज भारतीय लोकशाही करीत आहे. आज भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी "सबका साथ सबका विकास" याची घोषणा देतांना आपल्याला दिसतात तीच सर्वोदयाची संकल्पना रस्किन आपल्या "अंटु धिस लास्ट" या पुस्तकात मांडतो तोच मंत्र घेवुन महात्मा गांधीजींनी सर्वोदयाचा सिध्दांत घेवुन पुढे चालवला व ग्रामविकास कार्याला सुरुवात केली. त्यालाचा सर्वोदय ही म्हणता येईल. "भगवद्‌गीतेतील सर्वभुत हिताची कल्पना या अपेक्षित आहे. या विचारसरणीचा महात्मा गांधींनी व्याख्याने व प्रासंगिक स्फुटलेखातुन पुरस्कार केला आहे. जैन दर्शनातील विचार आणि रस्किनच्या "अंटु धिस लास्ट" या पुस्तकावरुन गांधीजींना हा विचार सुचला, कारण गांधीजींनी रस्किनच्या या पुस्तकाचे गुजरातीत भाषांतर

करुन त्याला सर्वोदय हे शिर्षक दिले होते."[२] गांधीजींच्या मते सर्वोदयाचा अर्थ एक विचार प्रणाली, सर्वांचे कल्याण, सर्वांचा उदय असाच दिसतो. परंतु गांधींनी फक्त सर्वोदय भारतीयांच्या उध्दाराबरोबर राष्ट्रीय आंदोलनाला चालना देणारा निर्माण केला. त्या संबंधी भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु आपल्या भारताचा शोध या पुस्तकात लिहितात. "ग्रामोद्योग व विशेषतः हातकताई व हातमाग पुन्हा सुरु करावेत अशी खटपट फार दिवसांपासून काँग्रेसने गांधीजींच्या नेतृत्वाखाली चालविली होती."[३] अर्थात सर्वोदय हा विकासाचा व ग्रामोधाराचा विषय असला तरी त्याची जोड राष्ट्रीय आंदोलनाला जोडण्याची ईच्छा गांधीजींची होती. थोडक्यात ग्रामविकास धोरण हे राष्ट्रीय आंदोलनाचे धोरण गांधींना अभिप्रेत होते.

त्याच बरोबर संपुर्ण भारतातील ग्रामीण भारताचा सर्वांगीन विकास झाला पाहिजे असे गांधीजींचे मत होते त्यासाठी त्यांनी गावोगावी ग्रामविकास कार्यासाठी आपले अनुयायी पाठविले होते. ग्राम स्वराज्य कल्पनेत गांधीजींनी आदर्श खेडयाची कल्पना मांडली त्यात त्यांना रचना बध्द खेडयाची रचना असावी. अन्न, वस्त्र, निवारा हे सगळयांना स्वयंःपुर्णतेने मिळावेत. प्रत्येक खेडयात पाणी पुरवठयाच्या सोयी, गुरांसाठी गोठे, खेळाची मैदाने, सांडपाण्याची व्यवस्था, प्राथमिक शिक्षण अनिवार्य असावे. प्रशासनाचे काम पंचायतीकडे असावे, सर्वसमाजाला समान सुरक्षा असावी आणि तेथे जातीय प्रथेला धारा नसावा.

जीवन आवश्यक गरजांबाबतीत प्रत्येक खेडे एक स्वंयपुर्ण घटक व्हावे अशी गांधीजींची कल्पना होती. उत्पादन, विनीयोग व वितरण या तीन्ही क्रिया याच पातळीवर असाव्यात, गांधीजींची ही कल्पना नवीन नव्हती प्राचिन भारतीय समाज व्यवस्थेत ती रुढ होती. तीचे पुनरुज्जीवन होणे त्यांना आवश्यक वाटत होते.

## १) गांधींचे ग्राम विषयक राजकीय विचार :-

महात्मा गांधी ग्राम विकासाची कल्पना करीत असतांना फक्त खेडे गावाचा ग्रामीण विकास मानत नाहीत ते समस्त जगाला ग्रामीणतेत मोडतात त्याला ते विश्वग्राम असे म्हणतात. त्यांच्या मते साऱ्या जगाला सांभाळण्यासाठी कोणत्याही अश्र, शस्त्राची गरज नाही. सर्व जगातील लोक आपल्या गरजा आपल्या देशात भागवू लागले तर दुसऱ्या देशावर आक्रमण करण्याची वेळ कोणावरच येणार नाही. त्यांच्यावर अमेरिकेतील हेन्री डेव्हीज थोरो या विचारवंताचा प्रभाव पडलेला होता. "थोरोच्या सिव्हील डिसओबीडिअन्स या निबंधापासुन गांधींनी प्रेरणा घेतली."[४] हेन्री डेव्हीज थोरो हा अमेरिकेत साधेपणाचा जनक मानला जातो. त्यांच्या अंगी प्रचंड विद्वत्ता असुन त्यांनी संपत्ती कमवीली नाही. एका नदीकाठी साधी झोपडी बांधुन तो तेथे राहत असे. त्याने तेथेच दोन ग्रंथ लिहिलेत त्यात त्याने सरकार कसे असावे सरकारला सामान्यांनी कोणते कर द्यावेत, कोणते कर देवु नयेत याचे सविस्तर विवेचन केले, तो म्हणतो माझ्यावर लादलेला कर दुसऱ्या देशावर आक्रमण करण्यासाठी वापरु देणार नाही. जो कर मी शासनाला देत आहे, त्यातुन शासनाने सामान्य लोकांसाठी पाणी, रस्ते, स्वच्छालय, असा शाश्वत विकास करण्यासाठी कर दिला पाहिजे. या थोरोच्या वागण्यामुळे थोरोला कारावास भोगावा लागला. या थोरोच्या विचारांनी भारतात महात्मा गांधींनी सविनय कायदे भंगाची चळवळ सुरु केली होती. तसेच गांधी विश्व सरकार निर्माण करण्याचा विचार करतात ते म्हणत जागतीक सरकार हे यांचे स्पष्टीकरण देतांना सांगतात राष्ट्राला त्याचा सार्वभौम सत्तेचा त्याग करणे होणार नाही. त्यासाठी सार्वभौम परावलंबन होवु नये असे गांधी म्हणतात त्यासाठी राष्ट्रीय स्वावलंबनापेक्षा विश्व स्वावलंबी होणे आवश्यक आहे. एका देशाने दुसऱ्या देशावर राज निर्माण करुन विश्व सरकार स्थापन करु शकणार नाही. स्वावलंबनाची दिशा साऱ्या विश्वाने घेणे आवश्यक आहे. त्या वाचून मानवाचा शाश्वत विकास होणार नाही. त्यासाठी सारे विश्व खेड झाले पाहिजे त्याच्यांवर कोणाचे नियत्रंण नसावे. विश्वातील सारी जनता जेव्हा आपली जगण्याची पध्दती स्वावलंबनाने जगू तेव्हा विश्व सरकार आपोआपच स्थापन होईल. एकदा एका अनुयायाने गांधींना प्रश्न विचारला 'विश्व-सरकार की स्थापना कैसे होगी ?'[५] तेव्हा गांधी म्हणाले "यह प्रश्न बडे महत्वका है," क्योंकि राष्ट्र की सार्वभौम सत्ता का त्याग करना बहुत आसान नही होगा। दुनिया में ऐसे इन-गिने ही राजपुरुष होंगे, जो गांधीजी की तरह कहेंगे, "राष्ट्रीय स्वातंत्रता की अपेक्षा सार्वभौम परस्परावलंबन के लिए अपनी तत्परता प्रकट करने करने में न तो मुझे कोई भव्यता दिखाई देती और न ऐसा करना असंभव मालुम होता। आत्मत्याग का स्वाभाविक क्रम यह होता है कि व्यक्ति समाज के लिए त्याग करता है, समाज जिले के लिए त्याग करता है, जिला प्रांत के लिए त्याग करता है, प्रांत राष्ट्र के लिए त्याग करता है, और राष्ट्र सारी जनता के लिए त्याग करता है।"[६] गांधीवर टॉलस्ट्रॉय या विचारवंताचा प्रभाव पडलेला होता. हा रशियन विचारवंत होता तो अराज्यवादाचा पुरस्कार करणारा विचारवंत होता. त्यातुनच गांधींनी विश्व-सरकारची संकल्पना निर्माण केली असावी असे वाटते. "टॉलस्ट्रॉयच्या विचारांनी प्रभावित होऊन गांधीजींनी जुलमी सरकारचे आदेश नम्रपणे नाकारण्यास सरुवात केली. व सरकार मध्ये परिवर्तन घडवुन आणण्याचा प्रयत्न केला."[७] सरकार परिवर्तन केव्हा करेन, जेव्हा समाजातील बहुसंख्य लोक एक मुखाने सरकारच्या धोरणाचा निषेध करतील तेव्हा सरकारला बदल करावा लागेल. त्यासाठी भारतीय समाज बदलला पाहिजे आणि त्यांना बदलायचे असेल तर गावा गावात जावुन त्यांना धार्मिक, आध्यात्मीक व आर्थिक दृष्टया बदलने, समजावने, त्यांना आत्मनिर्भर बनविणे हा उद्देश डोळयासमोर ठेवुन गावातील ग्रामविकासातून त्यांना राजकीय लढयास तयार करणे हे मोठे आव्हान गांधींसमोर होते. गांधी आफ्रिकेतुन परत आल्यावर मुंबई येथे आलेत तेथे त्यांनी नामदार गोखले यांची भेट घेतली. त्यावेळी गोखलेंनी त्यांना भारत भ्रमंतीचा सल्ला दिला. त्या सल्ल्याने आपला समाजाच्या विकासाचा मार्ग जनतेपर्यंत पोहचवूण त्यातुन राजकीय आंदोलन उभारणे हे कार्य त्यांनी सुरु करण्याचे ठरविले. त्या काळातच गांधी सन १९२१ मध्ये व सन १९२७ मध्ये खान्देशात येऊन गेलेत त्यावेळी गांधींना खान्देशात हजारो अनुयायी भेटलेत. असे म्हणतात की, सबंध भारतात

सगळयात जास्त अनुयायी गांधींना ग्राम विकासासाठी खान्देशात मिळालेत. खान्देश ग्राम विकासाचे केंद्र झाले होते. तसेच अनेक बाहेरील अनुयायी गांधी खान्देशात पाठवित असत. हा खान्देशातील ग्राम विकासातून राष्ट्रीयत्वाकडे जाणारा मार्ग गांधीना खान्देशातुन सुचला असावा. त्यापुर्वी गांधीवर 'रस्किन' या विचारवंताचा प्रभाव पडलेला होता. या रस्किनने "अन टु दी लास्ट"[८] या ग्रंथाचा प्रभाव गांधीवर पडला. व त्यांनी सर्वोदयाच्या भुमिकेतुन आपल्या कार्याची सुरुवात केली. असली तरी गांधीवर प्राचीन भारतातील ग्राम व्यवस्थेचा प्रभाव होता. त्यातुन त्यांनी स्वंयुपर्ण स्वशासित अशा खेडयांची कल्पना मांडली, ती 'ग्राम स्वराज्य' या नावाने प्रसिध्द आहे. आधुनिक तंत्र युगात माणसाचे स्वास्थ समाधान नष्ट झाले आहे. भौतिक प्रगतीच्या ध्यासापोटी माणूस आपले स्वास्थ गमावून बसला आहे. म्हणून औद्योगिकीकरण करुन मोठी शहरे निर्माण करणाऐवजी स्वंयपुर्ण अशी खेडी निर्माण झाली पाहिजेत, असा त्यांचा आग्रह होता. तसेच गांधीजींचा सर्व प्रकारच्या केंद्रीकरणाला विरोध होता. सत्तेचे केंद्रीकरण, मग ते आर्थिक सत्तेचे असो व राजकीय सत्तेचे असो. माणसाला गुलाम बनविते. म्हणून त्यांचा आग्रह सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा होता. मोठया उद्योगधंद्यामुळे उत्पादनाचे केंद्रीकरण होते. तसेच संपत्तीचे म्हणजे आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होते म्हणून उत्पादनाची स्विकेंद्रीत पध्दती असावी या दृष्टीने त्यांनी हस्तोद्योग आणि मुलोद्योगाचा पुरस्कार केला. तो करीत असतांना तीची जोड त्यांनी भारतीय राजकीय आंदोलनासाठी वापरली. त्याला नैतिक आधार देण्यासाठी गांधींनी सत्य आणिं अहिंसा या तत्वाची प्रस्थापना करण्यासाठी असहकार, सविनय कायदेभंग, उपवास इत्यादी मार्ग त्यांनी स्वीकारले. जुलूम आणि अन्याय या विरुध्द अहिंसात्मक पध्दतीने लढण्याचे ते मार्ग होते. सत्याग्रह आणि अहिंसा ही दोन तत्वे गांधीजींच्या विचारांचे मुलाधार होते. पण केवळ तत्वज्ञान म्हणून ती तत्वे स्वीकारलेली नसुन ते जुलूम, आणि अन्याय या विरुध्द लढण्याचे मार्ग म्हणून स्वीकारलेली होती.

## १) नैतिकता आणि राजकारण :-

भारतीय राष्ट्रीय आंदोलन करीत असतांना गांधींनी नैतिक मुल्यांना अतिशय महत्व दिलेले होते. गांधींना राजकारण व नीती यांची फारकत मान्य नव्हती. राजकारणाचा खरा आधार सत्य, निती व न्याय असावा असा गांधींचा आग्रह असे. राजकारणात नैतिकता असावी तेव्हाच राजकारणाचा दर्जा वाढेल असे गांधींचे ठाम मत होते. रक्तपाताने स्वातंत्र्य मिळविणे शक्य नाही. तरीही गांधींनी सन १९२० च्या असहकार आंदोलनात मोपला येथे अकाँग्रेसी यांनी जी हिंसा केली त्यासाठी गांधींनी आंदोलन मागे घेतले नाही. मात्र आपल्या अनुयांयामार्फत झालेल्या चौरी चौरा येथील हिंसक प्रकाराला गांधींनी आपली नैतिक जबाबदारी समजून असहकार आंदोलन मागे घेतले. या दोन उदाहरणांवरुन गांधींना कोणती राजकीय धारा मान्य होती याची जाणीव आपल्या होते. "मोपला उपद्रव, जैसे किसी हिंसाकाण्डसे सविनय आज्ञाभंग मुलतवी न होता परन्तु चौरी चौरासे हो गया। इसका सीधासा कारण यही है कि उसमें कॉंग्रेससे संबंध रखनेवाले लोगोंका हाथ था।"[९]

## २) लोकतांत्रिक राजकारण :-

गांधीजींच्या मतानुसार राजनैतिक सत्ता साध्य करणे हा अंतीम उद्देश नव्हता. लोकांच्या जीवनात प्रत्यक्ष बदल होणे त्यांच्या दृष्टीने आवश्यक होते. ते म्हणत "राजनीतिक क्षेत्र में आदर्श के समीप पहुँचता है। वे उस राज्य को उत्तम मानते है, जो कम-से-कम शासन करता है। साम्यवादी दर्शन के अनुसार, समाज का अंतिम रुप व होगा, जिसमें राज्य का अंत हो जाएगा।"[१०] त्यांच्या मते भारताने राजनैतिक स्वातंत्र्य प्राप्त केले तरी खरे लोकतंत्र गावातील लोकांसाठी असावे त्यांनी ग्राम विकास करावा "सच्चा लोकतंत्र केंद्र में बैठे हुए बीस व्यक्तियों द्वारा नहीं चलाया जा सकता। उसे प्रत्येक गाँव के लोगों को नीचे से चलाना होंगा।"[११] हे सांगत असतांना गांधीजी आपली शेवटची डायरी प्रसिध्द करतांना लिहितात भारताने राजनैतिक स्वातंत्र्य मिळवून घेतलेले आहे. परंतु जोपर्यंत गावा गावाचा विकास होत नाही तो पर्यंत संपुर्ण स्वातंत्र्य प्राप्त होवु शकत नाही. "अभी शहरो और कस्बों से भिन्न अपने सात लाख गाँवो के लिए सामाजिक, आर्थिक और नैतिक स्वतंत्रता प्राप्त करना बाकी है।"[१२] असे गांधींचे मत होते. त्यांनी ग्राम-स्वराज्य अर्थात पंचायत राज या विषयी कल्पना मांडलेली आहे. त्यात त्यांना पुर्ण स्वराज्य अभिप्रेत होते. पुर्ण स्वराज्यात गरीबातील गरीब व्यक्ती व राजा यांच्यातील अंतर कमीत कमी असावे त्यांच्यात स्वावलंबी स्वंयपुर्णता असावी असा उद्देश गांधींचा होता.

## ३) पुर्ण स्वराज्य :-

गांधीजींनी पुर्ण स्वराज्य विषयी आपल्या ग्राम स्वराज्य या ग्रंथात आपले विचार अतिशय स्पष्ट मांडलेले आहेत. ते पुर्ण स्वराज्य विषयी म्हणतात, "जितना किसी राजा के लिए होगा, उतना ही किसान के लिए, जितना किसी धनवान जमींदार के लिए होगा, उतना ही भुमिहीन खेतिहर के लिए, जितना हिंदुओं के लिए होंगा, उतना ही मुसलमानो के लिए, जितना जैन, यहुदी, और सिख लोगों के लिए होंगा, उतना हो पारसियों और ईसाइयों के लिए। उसमें जाति पाँति, धर्म या दर्जे के भेदभाव के लिए कोई स्थान नही होंगा।"[१३] यात आलेल्या गांधीजींच्या विचारांची दिशा भारतीय समाज जीवनावर पडलेली दिसते, भारत स्वातंत्र्य झाल्यावर भारतीय राज्यघटनेत या विचारांचा अंतर्भाव आपल्याला आलेला दिसतो. म्हणूनच भारतीय राज्य घटनेत समानता दिसत आहे सर्व धर्म समभाव दिसुन येतो. स्वतंत्र्य भारतात जाती पातींचा विचार करुन ग्रामीण विकासाचा पाया रचला जात आहे. त्यातुनच ग्राम विकासाला चालना मिळाली आहे, मिळत आहे. "गांधीजी जाति, धर्म, रुप रंग,

भेद से दूर रहकर केवल मानवताकी मे जुटे थे।"[१४] गांधीजींच्या या धार्मिक असहिष्णूता व सामाजिक सदभावना या तत्वात गांधी ग्रामविकासाला खरा आधार मानत होते. ग्रामविकासापासून भारत निर्माण होईल असे त्यांचे मत होते. राजनैतिक आध्यात्मीकरण ग्रामातून निर्माण होऊ शकते असे ते मानत होते. "गांधीजींने राजनीति का आध्यात्मीकरण किया यानी राजनीति में श्रेष्ठ मुल्योका अवतरण हो एवं राजनीति मनुष्य की प्रगतीका माध्यम बने. ऐसा उनका विचार था।"[१५]

## २) महात्मा गांधींचे पर्यावरण विषयक विचार :-

गांधीजींच्या काळात पर्यावरणाची समस्या आज इतकी गंभीर स्वरुपाची नव्हती. म्हणून गांधींनी अशी कोणतीही ठोस उपाययोजना किंवा सिध्दांत सांगीतला नाही. परंतु मनुष्य आणि प्रकृति यांच्यातील संबंध चांगल्या प्रकारे जानत होते. आधुनिक अभ्यासकांनी त्यांना पर्यावरणाचे दुत म्हटले आहे. गांधीजी तेव्हां निर्माण होणाऱ्या औद्योगिक सभ्यता बाबतींत फार चिंतीत होते. त्यांचा मते भारतात निर्माण होणाऱ्या उपभोक्तावादा बाबतीत ते सावध भुमिका घेणारे होते. त्या संबंधी उदभवणारे प्रश्न आपले पुस्तक 'हिंद स्वराज्य' ही सन १९०९ मध्ये प्रकाशित केली त्यात त्यांनी हे प्रश्न मांडलेत या पुस्तकातून त्यांनी पाश्चात्य औद्योगिक सभ्यता विषयी टिका केलेली आहे. त्यात ते म्हणतात पाश्चात्य लोक पर्यावरण प्रदुषण करण्यास जबाबदार आहेत. त्यांनी पर्यावरण सरंक्षण हेतु अहिंसावादी नीतिशास्त्र चा संदेश दिला ते म्हणतात. "हमारे जीवन का पर्यावरण के साथ घनिष्ठ सम्बध्द है। भारतीय संस्कृति तो प्रकृति की जीवन्तता की पक्षधर रही है। भारतीय धर्मशास्त्रो मे मनुष्य के उन कर्तव्यों को करणीय बताया गया है। जो जीवित पदार्थो पशु-पक्षी, जल-थल, ग्रह-नक्षत्र सबके प्रति है। मनुष्य का यह परम कर्तव्य है कि वह प्रकृति की आज्ञा के बिना उससे कुछ न ले। अपनी पुस्तक हिंद स्वराज्य में गांधीजी ने कहा है कि 'मन की वृत्तियां चंचल है।' उसका मन बेकार की दौड-धुप किया करता है। उसका शरीर जैसे-जैसे ज्यादा देते जाऐं वैसे-वैसे ज्यादा मांगता जाता है। ज्यादा लेकर भी सुखी नही होता। भोग भोगने से भोग की इच्छा बढती है।"[१६] गांधीजींच्या विचारांनी सर्व जीवंत प्राण्यांमध्ये मानवीय मुख्य अंतभुर्त आहेत आणि त्याचा आधार आध्यात्मिक आहे. ज्याप्रमाणे आपण श्वास घेण्यासाठी नैतिक दाब अनुभवत नाही त्याच प्रमाणे आपण आपल्या आत्म्यास सर्व प्राणीमात्रात विस्तारीत केले तर विना दबावाची आपण स्वतः प्रकृतिची सुरक्षा करु शकु. "गांधीजी हमेशा कहते थे कि अपनी आवश्यकताओं को कम करो। हमारे भोग के लिये प्रकृति ने हमें सब कुछ दिया है।"[१७] त्या करीता मानवाने पर्यावरण रक्षण करणे आवश्यक आहे. पर्यावरणाचा जास्त ऱ्हास केल्यास मानवाला त्याचे परिणाम भोगावे लागतीलच सृष्छीचा उपभोग घेणे हे स्वाभावीक प्रक्रिया आहे. मात्र त्याचा अतिऱ्हास करणे व तो उपभोग्य आहे. म्हणून तीचे पतन करणे म्हणजे मानवी जीवनाचा ऱ्हास करणे होय. गांधी त्याला ट्रस्टी शिप असे म्हणतात. "शारिरीक शक्ति, बुध्दि या क्षमता-उसके हम मालिक नही, ट्रस्टी है।"[१८] या पर्यावरणातील निसर्ग रचीत उस्तुंचा उपयोग गरजेपुरता करावा तसेच जितका आपण निसर्गाचा उपयोग केला तितका मोबदला आपण निसर्गाला दिला पाहिजे. शरिराचे जसे आपण ट्रस्टी आहोत. त्याप्रमाणे आपण निसर्गाचे ट्रस्टी आहोत. म्हणून जीवनात आपण आवश्यकते पेक्षा जास्त पर्यावरणाचा उपभोग घेवु नये असे गांधी म्हणतात. "अपरिग्रह या असंग्रह का उनका सिध्दांत भी हमें आवश्यकता से अधिक वस्तुओं के न रखने की शिक्षा देता है।"[१९] अपरिग्रह सनातन धर्माचे मुल्य आहेत. मानव जास्तीस जास्त उपभोग घेतल्यामुळे मानसिक असंतुलन, अपराध, शोषणवृत्ती आणि हिंसा या सारख्या वाईट गोष्टींना सामोरे जात आहे. मानवी हस्तक्षेपामुळे निसर्ग असंतुलीत होत आहे. "प्रकृति में सबके भरण-पोषण की पर्याप्त गुंजाइश हैं पर किसी एक भी व्यक्ति के लोभ या लालच की, पूर्ति के लिये पृथ्वी के पुरे संसाधन भी पर्याप्त नही है।"[२०] त्याकरीता संपुर्ण मानव जातीने निसर्गाचा सन्मान केला पाहिजे गांधीजींच्या मते मनुष्य या सर्व सृष्टीचा स्वतंत्र घटक नसुन तो त्यात अंतर्भुत आहे. तो निसर्गाचा अविभाज्य घटक आहे. ते दोन्ही एक दुसऱ्याचे परस्पर अवलंबुन असलेले घटक आहेत. म्हणून निसर्गाशी एका घटकाला वेगळे करुन चालणार नाही. या साठी गांधीजींनी आपल्या वैयक्तिक जीवनात पर्यावरणाच्या सरंक्षणाबाबत सुत्र सांगीतले आहेत. "१) संघर्ष और दौड, नहीं सहयोग, २) भोग नही संयम, ३) उत्पादक शरीर श्रय जीवन का आधार, ४) स्वावलम्बन, ५) केंद्रीकरण नही विकेंन्द्रीकरण तथा, ६) कर्तव्य भावना."[२१] गांधीजींच्या म्हणण्यानुसार पर्यावरण संकटाला दूर करण्यासाठी नवीन जीवनाचा आधार शोधावा लागेल त्यासाठी नव्या विचारांची सुरुवात करावी लागेल. भोगवादी संस्कृति बाजुला सारुन सर्वांनी एक दिलाने पर्यावरण सरंक्षणासाठी पुढे आले पाहिजे. ही जबाबदारी एका व्यक्तिची नसुन जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीस पर्यावरणाचा उपभोग घ्यावयाचा आहे. त्यासाठी प्रत्येक व्यक्तीने आपण उपभोगलेल्या वस्तुचे पुर्ननिर्माण करुन पर्यावरण रक्षण करणे प्रत्येकाची जबाबदारी आहे. कारण निसर्गाचा उपभोग गरीब श्रीमंत समान स्वरुपात उपभोग घेत असतो. त्यासाठी प्रत्येकाने पर्यावरण रक्षण करावे असे गांधी म्हणतात. तेव्हांच आपण संपुर्ण पृथ्वीचे पर्यावरण सरंक्षण करु शकतो.

## संदर्भ :-


**१)** वृत्तपत्र"लोकसत्ता-मुंबई ६ ऑगस्ट २०१६ पृष्ठ क्र.६

**२)** वाड विजया (संपा) मराठी विश्वकोश खंड १८ पृष्ठ क्र. ८२७

**३)** नेहरु पंडीत जवाहरलाल, भारताचा शोध (अनु) साने गुरुजी, करंदीकर ना.वि.कॉन्टिनेटल प्रकाशन पुणे ३० पृष्ठ क्र. ४५२

**४)** वृत्तपत्र कोकसत्ता-मुंबई शनिवार ६ ऑगस्ट २०१६ पृष्ठ-६

**५)** गांधी महात्मा, ग्राम महात्मा, ग्राम स्वराज्य पृष्ठ-१२

**६)** कित्ता. पृष्ठ क्र.-१२
**७)** डॉ. पाटील वा.भा. आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन्स पृष्ठ क्र.-२८
**८)** कित्ता. पृष्ठ क्र.-२८
**९)** गांधीजी, सर्वोदय, नवजीवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद-१४ पृष्ठ क्र.-१२९
**१०)** महात्मा गांधी, ग्राम स्वराज्य पृष्ठ-१५
**११)** कित्ता. पृष्ठ-१६
**१२)** कित्ता. पृष्ठ-१७
**१३)** कित्ता. पृष्ठ क्र.-२७
**१४)** खोज गांधीजीकी गांधी रिसर्च फाउण्डेशन, जलगाँव की संयुक्त पत्रिका दिसम्बर-२०१५ पृष्ठ क्र.-१
**१५)** जैन अशोक, खोज गांधीजीकी, गांधी रिसर्च फाउण्डेशन, जलगाँव की संयुक्त पत्रिका दिसम्बर २०१५ पृष्ठ क्र.४
**१६)** पाण्डेय श्रीप्रकाश (संपा) खोज गाँधी की, गाँधी रिसर्च फाउण्डेशन, जलगाँव, जुन २०१४, पृष्ठ-९
**१७)** गांधी महात्मा 'सर्वोदय' पृष्ठ क्र.-१६
**१८)** पाण्डेय श्रीप्रकाश (संपा) खोज गांधीकी, गांधी रिसर्च फाउण्डेशन, जलगाँव जुन २०१४ पृष्ठ-९
**१९)** कित्ता. पृष्ठ-९
**२०)** कित्ता. पृष्ठ ९
**२१)** कित्ता. पृष्ठ ९